# नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०३ /२०२५ दि. २८/०८/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, नारपोली** वाहतूक उप विभागाचे हद्दीत **दिनांक २७/०८/२०२५ ते दिनांक ०६/०९/२०२५** या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. त्या अनुषंगाने गणेशमुर्ती विसर्जनाचे दिवशी मोठया संख्येने भाविक निघत असतात. नमूद कालावधीत विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) नवी मुंबई कडुन मुंब्रा माणकोली मार्गे गुजरात कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कळवा वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **गॅमन जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **प्रवेश बंद –** | २) मुंबई कडुन माजीवाडा वाय जंक्शन – माणकोली मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कापुरबावडी वाहतूक विभागाच्या हद्दीत **माजीवाडा वाय जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **प्रवेश बंद –** | ३) मुंबई व नवी मुंबई कडुन बाळकुम नाका, अंजुर फाटा मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कापुरबावडी वाहतूक विभागाच्या हद्दीत **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **प्रवेश बंद –** | ४) गुजरात कडून चिचोंटी नाका मार्गे नारपोली वाहतूक विभागाच्या हद्दीत अंजुर फाटा मार्गे नाशिक/मुंबई/नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **चिंचोटी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **प्रवेश बंद –** | ५) भिवंडी वाहतूक उप विभाग येथुन नारपोली वाहतूक उप विभाग हद्दीत अंजुर फाटा मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **कल्याण नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना **दिनांक ३१/०८/२०२५ ( पाच दिवस), दिनांक ०२/०९/२०२५ ( गौरी गणपती व सात विसर्जन दिवस ) व दिनांक ०६/०९/२०२५ ( अनंत चर्तुदशी )** या कालावधीत दुपारी १४.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहिका, अत्यावश्यक सेवेतील वाहने व गणपती मूर्ती विसर्जनातील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिक, भिवंडी
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, कल्याण व नवी मुंबई
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, ठाणे/भिवंडी/कल्याण

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ भिवंडी व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.भिवंडी निजामपूरा शहरा च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.